श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला
यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप त्यांनी मान्य केल्याने
त्यांचेवर शिस्तभंग कारवाई करणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-४/२६४/२०२४
दिनांक २९/०४/२०२४

वाचा – १. मा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि प अहमदनगर यांचेकडील दोषारोप ज्ञापन क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-४/५२८/२०२१ दिनांक ०२/०२/२०२१
२. श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे,आरोग्य सेवक महिला, यांचेकडील दिनांक १८/०२/२०२१ रोजीचा दोषारोपाचा खुलासा
३. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.कार्या-२/आस्था-४/१२९/२१ दिनांक ३१/०३/२०२१
४. या कार्यालयाकडील पत्र क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-४/८७४/२०२३ दिनांक १९/१२/२०२३
५. वैदयकीय अधिकारी, प्राआकेंद्र लाडगांव, यांचेकडील पत्र क्र./वशि/आरोग्य/आस्था/५७९/२०२३ दिनांक २०/१२/२०२३
६. या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-४/९१०/२०२४ दिनांक २५/०१/२०२४
७. वैदयकीय अधिकारी,प्राआकेंद्र लाडगांव, यांचेकडील पत्र क्र./वशि/आरोग्य/आस्था/०१/२०२४ दिनांक ०२/०१/२०२४
८. वैदयकीय अधिकारी,प्राआकेंद्र चंदनापुरी यांचेकडील पत्र क्र.प्राआके/आस्था/४१/२०२४ दिनांक १०/०२/२०२४
९. तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र./आरोग्य/१०८/२४ दि.०४/०३/२०२४ व सोबत श्रीम. संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, यांचेकडील खुलासा दि.२२/०२/२०२४

श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, यांनी दिनांक १०/०९/२०२० रोजी उपकेंद्र वारंघुशी येथे श्रीमती मंजाबाई निरंकार लोटे हया प्रसुतीसाठी आल्या असतांना त्यांना जाणुन बुजून आरोग्य सेवा दिलेली नाही. संदर्भ क्रमांक १ अन्वये त्यांचे विरुध्द गैरशिस्त/गैरवर्तणुकी बाबत दोषारोप ०१ ते ०४ बजावण्यात आलेले होते. संदर्भ क्रमांक २ अन्वये श्रीम संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, यांनी दोषारोपाचा खुलासा सादर करुन दोषारोप मान्य केलेले आहेत.

**दोषारोप क्रमांक १ प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णास आरोग्य सेवा न दिल्याबाबत** – दिनांक १०/०९/२०२० रोजी उपकेंद्र वारंघुशी, प्राथमिक आरोग्य केंद्र लाडगांव येथे श्रीमती मंजाबाई निरंकार लोटे, वय ३३ वर्षे हया दुस-या खेपेच्या प्रसुतीसाठी दुपारी १२.०० वाजता आल्या होत्या. त्यावेळी श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला हया उपकेंद्रामध्ये उपस्थित नसल्याचे आढळून आले. त्यांच्या मुलीने श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला हया गृहभेटीसाठी बाहेर गेलेल्या असल्याचे सांगितले. त्यामुळे श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, यांचा ग्रामस्थांनी गावामध्ये शोध घेतला असता त्या गावामध्ये आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया लवकर उपकेंद्रात याव्यात म्हणुन गावात दंवडीही देण्यात आली होती. तथापि श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया उपकेंद्रामध्ये वेळेत न आल्याने शेवटी सौ. अनिता संजय कडाळी, सरपंच, ग्रामपंचायत वारंघुशी यांनी गावातील महिला सौ. सोनाबाई बळीराम लोटे यांनी शेतावरुन दोन कि.मी. अंतरावरती येऊन घरगुती पध्दतीने श्रीमती मंजाबाई निरंकार लोटे यांची

दुपारी ३.०० वाजता प्रसुती केली तरी देखील श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया उपकेंद्रात आल्या नाहीत. दरम्यानच्या कालावधीमध्ये दुपारी ३.१५ वाजता ग्रामस्थ व पदाधिकारी यांना श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया निवासस्थानामध्ये असल्याचा संशय आल्याने त्यांनी निवासस्थानामध्ये शोध घेतला असता श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया बाथरुममध्ये लपुन बसल्याचे आढळून आले. श्रीमती संगिता बाळकृष्ण रोकडे, आरोग्य सेवक महिला, हया उपकेंद्रामध्ये असुन देखील त्यांनी जाणुन बुजून प्रसुतीसाठी आलेल्या महिलेस आरोग्य सेवा दिलेली नाही. त्यामुळे प्रसुतीसाठी आलेल्या रुग्णास आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागले. त्यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी उपकेंद्रास टाळे ठोकले. काम करत असतांना कर्तव्यात कसूर व निष्काळजीपणा करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेला आहे.

संदर्भ क्रमांक २ अन्वये आपण दोषारोप मान्य केल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ नियम ४ (४) नुसार समयश्रेणीतील निम्नस्तरावर आणणे ही शिक्षा नमुद करुन अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. सदरची नोटीस संदर्भ क्रमांक ५ अन्वये आपणास बजावण्यात आलेली असले बाबत पोहच प्राप्त आहे. सदर अंतिम कारणे दाखवा नोटीस आपल्याला दि.२७/१०/२०२१ रोजी प्राप्त झालेली आहे. तथापि संदर्भ क्रमांक ७ व ८ अन्वये संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपण दिनांक ३१/०३/२०२१ च्या अंतिम कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा सादर केला नसल्याचे कळविले आहे. तथापि संदर्भ क्रमांक ९ अन्वये आपण सादर केलेला खुलासा संयुक्तीक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

आपण आपल्या कर्तव्यात कसुर व निष्काळजीपणा केल्याचे सिध्द झालेले आहे. सबब आपण महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ नियम ४(४) समयश्रेणीतील निम्नस्तरावर आणणे हि शिक्षा अंतिम करणेत येत आहे. सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करण्यात यावी व संबंधिताचे मुळसेवा पुस्तकात याची नोंद घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 20220429100076 असा आहे.

(आशिष येरेकर,भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

**प्रति,**

श्रीम.रोकडे संगिता बाळकृष्ण, आरोग्य सेवक महिला

**द्वारा व प्रत** - वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनापुरी, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर

२/- सदर आदेशाची प्रत श्रीम.रोकडे संगिता बाळकृष्ण यांना बजाविण्यात येवुन त्यांच्या दिनांकित स्वाक्षरीची पोहच प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती संगमनेर,

(आशिष येरेकर,भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**